**प्रेसनोट** दि. 23/02/2026

**अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणेकडून पंचायत समिती कार्यालय, माळशिरस, जि. सोलापूर येथील वरीष्ठ सहाय्यकास लाच मागणी करून स्विकारले प्रकरणी कारवाई केलेबाबत.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **पुणे** |
| **पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक** | माळशीरस पोलीस स्टेशन, सोलापुर ग्रामीण. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, 1988 चे कलमान्वये |
| **तक्रारदार** | पुरूष, वय 30 वर्ष, सरकारी ठेकेदार |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | सुंदरराव उत्तम नागटिळक वय- 56 वर्षे पद- वरीष्ठ सहायक, पंचायत समिती कार्यालय माळशिरस जिल्हा सोलापूर, राहणार घर क्रमांक 538, प्लॉट नंबर 42, प्रतिभाताई परिचारक नगर, टाकळी रोड, पंढरपूर **(वर्ग - 3)** |
| **सुरवातीस मागणी केलेली लाचेची रक्कम** | **रू. 10,000/- (दहा हजार रूपये)** |
| **पडताळणी दरम्यान लाच मागणी** | **रू. 5,000/- (पाच हजार रूपये)** |
| **सापळा कारवाई वेळी स्विकारलेली लाच रक्कम** | **रू. 5,000/- (पाच हजार रूपये)** |
| **पडताळणी दिनांक** | दि. 16/02/2026 व दि. 17/02/2026 |
| **सापळा दिनांक** | दि. 23/02/2026 |
| **ठिकाण** | पंचायत समिती कार्यालय, माळशिरस, जि.सोलापुर. |
| **सापळा अधिकारी यांचे नाव व पद** | श्री. खंडेराव रंजवे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि, पुणे (मो.क्र. 9923486428) |
| **तपास अधिकारी यांचे नाव व पद** | श्री शैलेश पवार, पोलीस निरीक्षक, ला प्र वि. सोलापूर (मो.क्र. 9112121668) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार हे इंजिनियर असून ते मजूर संस्थांना मिळालेल्या सरकारी कामांमध्ये सब कॉन्ट्रॅक्टर म्हणून काम करतात. त्यानुसार लक्ष्मी मजूर संस्थेस मौजे धर्मपुरी गावातील सभामंडप बांधण्याचे काम मिळाले होते ते काम पूर्ण करण्यासाठी लक्ष्मी मजूर संस्थेने तक्रारदार यांना सब कॉन्ट्रॅक्टर म्हणून नेमून काम पूर्ण करण्यास सांगितले होते तसा दोघांमध्ये करार करण्यात आला होता.

तक्रारदार यांनी सदर सभा मंडपाचे काम पूर्ण करून त्यांचे रुपये 9,74,571/- रुपये बिल समाज कल्याण सोलापूर येथील कार्यालयात सादर केले होते. त्यानंतर समाज कल्याण कार्यालयाकडून सदर काम पूर्णत्वाचा (Work Completion Certificate) अहवाल पंचायत समिती माळशिरस कार्यालयाकडून पत्राद्वारे मागाविला होता. लोकसेवक नागटिळक हे पंचायत समिती, माळशीरस येथे वरीष्ठ सहाय्यक म्हणून नोकरीस आहेत त्यांनी सदर काम पूर्णत्वाचा दाखला/ अहवाल देण्यासाठी माळशिरस तालुक्याचे बीडीओ यांच्यासाठी तक्रारदार यांच्याकडे रुपये 10,000/- लाचेची मागणी केले बाबत तक्रारदार यांनी दिनांक 16/02/2026 रोजी लाप्रवि, पुणे कार्यालयाकडे तक्रार दिली होती.

तक्रारदाराच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि.16/02/2026 व 17/02/2026 रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई केली असता दि.17/02/2026 रोजीच्या पडताळणी दरम्यान यातील आरोपी लोकसेवक नागटिळक यांनी तक्रारदार यांच्या वरील कामासाठी BDO यांच्याकरीता 5,000/- रुपयाच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

आज दिनांक 23/02/2026 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आलोसे नागटिळक यांनी तक्रारदार यांना BDO यांच्या सहीचा काम पूर्णत्वाचा अहवाल देऊन तक्रारदार यांच्याकडून 5,000/- रुपयाची लाच 15.08 वाजता पंचासमक्ष स्वीकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

यावरून आलोसे नागटिळक यांचे विरुद्ध माळशिरस पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री.**

शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.

1) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक -020-26122134, 26132802, 26050423, 9403781064
2) व्हॉट्स-ॲप क्रमांक - **9403781064** (पुणे), 9930997700 (मुंबई)
3) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
4) वेबसाईट - https://acb.maharashtra.gov.in
5) ऑनलाईन तक्रार करणेसाठी – https://acb.maharashtra.gov.in/bribe-compliant



